**<u>नियमित दिवाणी कज्जा क्र.१३७/२०२१ मधील नि.क्र.२८ वरील</u>**

**<u>आदेश</u>**

( पारीत दिनांक – १८/०३/२०२३)

सुनिता शिवाजी ढोणुक्षे वगैरे-०२ विरुध्द  शिवाजी ईश्वर ढोणुक्षे वगैरे-०५.

**CNR -MHKO130007082021**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करुन घेणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचे काम आजरोजी मे.कोर्टमजकुरी नेमले असून सदर कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत दाखल करणेसाठी ३३४ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा प्रतिवादींनी मुद्दामहून केलेला नाही. प्रतिवादी हे अडाणी व शेतकरी कुटूंबातील असल्याने वेळेत कैफियत कोर्टात येवून कैफियत दिलेली नाही. तरी सदरचा विलंब माफ व्हावा व सदरची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी प्रतिवादींची विनंती आहे.

३. सदर अर्जावरती खालील बाजूस वादीने त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा, लबाडीचा व रचनात्मक असल्याने सदर अर्ज वादींना मान्य व कबुल नाही. सदर अर्जामध्ये प्रतिवादींनी कोणतेही दृढ अथवा सक्षम असे कारण दिले नसल्याचे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी वादीची विनंती आहे.

४. उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणी अभिलेखाचे अवलोकन करता, कैफियत दाखल करण्यास कायदयाने निश्चित केलेला कालावधी उलटून गेला आहे असे दिसून येते. त्यानंतर, दि. १७/०२/२०२३ रोजी प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे असे दिसून येते. अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथने ही शपथेवर आहेत. त्यामुळे, ती ग्राह्य धरावी लागतील. नैसर्गिक न्याय तत्त्वाचा विचार करता, प्रतिवादी यांना कैफियत मांडण्याची संधी देणे योग्य राहील, तसे न केल्यास नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल असे वाटते. तसेच, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे ही न्यायाच्या दृष्टीने योग्य राहणार आहे. प्रस्तुत प्रकरणी झालेला विलंब हा जवळपास ३३४ दिवसांचा आहे. सदरचा अर्जामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादी यांच्यावर बसविणे योग्य राहील.

सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. २८) प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये ४००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. १ व २ यांची कैफियत दाखल करण्यात येते.

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.03.18 17:34:21 +0530

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – १८/०३/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.